महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०१६

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

राजापूर तालुक्याचे विभाजन करुन रायपाटण या नविन तालुक्याची निर्मिती करण्याबाबत

(१) १४०२ (२३-१२-२०१४). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर तालुक्याचे विभाजन करुन रायपाटण या नविन तालुक्याची निर्मितीची मागणी सन १९९० पासून स्थानिक ग्रामस्थ करित आहेत, हे खरे आहे काय,

(२) या प्रकरणी शासनाच्या महसूल व वन विभागात नस्ती क्र.४५०३/आरनईएन/२९९६/६३३/ प्र.क्र.१०१५/म-१० प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालिन मुख्यमंत्री यांनी स्थानिक ग्रामस्थांना शासकिय सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने रत्नागिरी जिल्हाधिकारी यांना निर्देश दिले होते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, यावर शासन कोणता निर्णय घेणार आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथराव खडसे (१८-०२-२०१६) :(१) होय.

(२) व (३) दि.२१.०६.२०१२ रोजी मंत्रालयास लागलेल्या आगीमध्ये प्रश्नांधीन कागदपत्रे जळून नष्ट झाल्याने सदरची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही.

(४) तालुका पुनर्रचनेबातचे निकष ठरविण्याकरिता गठित करण्यात आलेल्या आयुक्त कोकण विभाग, नवी मुंबई, यांचे अध्यक्षतेखालील समीतीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून त्यावर सविस्तर अभिप्राय देण्याबाबत सर्व विभागीय आयुक्तांना कळविण्यात आले आहे. विभागीय आयुक्तांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर तालुका पुनर्रचनेबाबतचे शासनाचे धोरण निश्चित करण्याचे संकल्पित आहे व त्या आधारेच राज्यातील तालुक्यांची पुनर्रचना करुन नवीन तालुक्यांच्या निर्मितीबाबतचा यथोचित निर्णय घेण्याचे योजिले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई उपनगरातील नागरी निवास परिषद, गोरेगाव (पूर्व) यांना प्रदान करण्यात आलेल्या भूखंडाच्या मिळकत पत्रिकाबाबत

(२) २८७९ (२३-१२-२०१४). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील नागरी निवास परिषद, गोरेगाव (पूर्व) यांना प्रदान करण्यात आलेल्या भूखंडाच्या मिळकत पत्रिका संबंधित गृहनिर्माण संस्थेच्या नावे उघडणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कार्यवाही केली आहे काय,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०६-०२-२०१६) :(१) होय.

(२) नागरी निवारा वसाहतीमधील ११३ सहकारी गृहनिर्माण संस्थांसोबत करावयाचा करारनामा जिल्हाधिकारी कार्यालयाने सर्व गृहनिर्माण संस्थांकडे मान्यतेसाठी पाठविला आहे. सदरचा करारनामा ज्या गृहनिर्माण संस्थांना मान्य आहे अशा ८९ गृहनिर्माण संस्थांसोबत करारनामा करुन तो निष्पादित करणेत आलेला असून त्यापैकी १५ गृहनिर्माण संस्थांच्या नावे स्वतंत्रपणे मिळकत पत्रिका प्रदान करण्यात आलेल्या आहेत.

उक्तप्रमाणे उर्वरित प्रकरणामध्ये करारनामे करण्याची व स्वतंत्रपणे मिळकत पत्रिका उघडण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अंधेरी पश्चिम, मुंबई येथील मोक्याच्या ठिकाणी असलेले शासकीय भुखंडावर अंबानी रुग्णालयाने सर्वसामान्यांना तळघरातील पार्किंगला विरोध केल्याबाबत

(३) १०६९२ (०४-०४-२०१५). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.अर्जुन खोतकर (जालना) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी पश्चिम, मुंबई येथील मोक्याच्या ठिकाणी असलेले शासकीय भुखंड अल्पदरात मिळविणाऱ्या अंबानी रुग्णालयाने सर्वसामान्यांना तळघरातील पार्किंगला विरोध करुन आपल्या फायद्यासाठी त्या जागेचा वापर सुरु केल्याचे नुकतेच उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयाच्या आवारातील जागा पार्किंगसाठी उपलब्ध करुन देण्याची मागणी मॉडेल टाऊन फेडरेशनने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) या प्रकरणाची अद्याप चौकशी केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत तसेच याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. एकनाथराव खडसे (०६-०२-२०१६) :(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पश्चिम विभागामार्फत करण्यात आलेल्या पहाणीत कोकिळाबेन धीरुभाई अंबानी रुग्णालयाच्या तळघराच्या जागेचा वापरा वाहनतळा व्यतिरिक्त होत असल्याचे निदर्शनास आले नाही. तथापि, सदर तळघरातील वाहनतळाच्या जागेचा वापर सर्वसामान्य नागरीकांना करु देण्याबाबत रुग्णालयास कळविण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

अध्यक्ष फेडरेशन ऑफ को.ऑ.हौ.सोसायटीज ऑफ मॉडेल टाऊन लि. यांनी दिनांक ८.५.२०१३ च्या पत्रान्वये मौजे आंबिवली, ता. अंधेरी येथील सर्व्हे क्र. १४१ अ, न.भू.क. ८३३ मधील मंजूर अभिन्यासातील अंतर्गत रस्ते व विकास नियोजन रस्त्यावर पार्किंग करण्यात येणाऱ्या बाहेरील गाड्यांकरीता पार्किंग शुल्क आकारण्यास परवानगी मिळणेबाबतची विनंती अर्ज जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्याकडे केलेला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्हयामध्ये अल्पभूधारक, भूमीहीन लोकांना अतिरिक्त शेरा असलेल्या शेकडो एकर शासकीय जमिनीचे वाटप करण्यात आल्याबाबत

(४) ११२१९ (०७-०४-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयामध्ये अल्पभूधारक, भूमीहीन लोकांना अतिरिक्त शेरा असलेल्या शेकडो एकर शासकीय जमिनीचे वाटप करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाटप करण्यात आलेल्या जमिनी शासनाच्या अटी न नियम डावलून जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीशिवाय सदर जमिनीचे परस्पर विल्हेवाट लावण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(४) तद्नुसार शासनाच्या मुळ हेतूलाच हरताळ फासणाऱ्या दोषी व्यक्तीविरुध्द शासन स्तरावर काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१७-०२-२०१६) :(१), (२) व (३), (४) व (५) कोल्हापूर जिल्ह्यामध्ये मौजे सातार्डे ता.पन्हाळा येथील गट नं. ८५९ मध्ये जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचेकडील शेतजमीन वाटप आदेश दि. ८/६/१९७३ अन्वये भूमीहीन लोकांना जमीन वाटप करण्यात आली आहे. तसेच हातकणंकले, चंदगड, कागल, राधानगरी व शाहूवाडी या तालुक्यात काही अल्पभूधारक, भूमीहीन लोकांना शेतजमीन कमाल धारणा कायद्यान्वये अतिरिक्त ठरलेल्या जमिनीचे वाटप करणेत आलेले आहे. अशा जमिनीचे विक्री व्यवहार जिल्हाधिकारी यांच्या पूर्व परवानगी शिवाय झाले आहेत किंवा कसे याबाबत सखोल चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना देण्यात आलेल्या आहेत.

राज्यातील सिंधुदुर्ग जिल्हयातील शेतक-यांना ७/१२ सरकारी कामासाठी वापरावयाचे नाहीत असा शिक्का मारुनच दिले जात असल्याबाबत

(५) ११८८९ (०७-०४-२०१५). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सिंधुदुर्ग जिल्हयातील तहसिल कार्यालय येथून जमीनीचे ७/१२ संगणकावर उपलब्ध केले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संगणकांवरील ७/१२ मध्ये जवळपास गेली १० वर्षे फेरफार बदलाची नोंद् करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही नोंद न केल्यामुळे हे ७/१२ शेतक-यांना निरर्थक ठरतात तसेच हे ७/१२ सरकारी कामासाठी वापरावयाचे नाहीत असा शिक्का मारुनच दिले जातात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ७/१२ वरील सुधारणा करण्याची गरज असल्यामुळे शासन कोणती कार्यवाही करणार व केव्हा करणार ?

श्री. एकनाथराव खडसे (२५-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ चे उतारे तहसिल कार्यालयाकडून दिले जात नाहीत.

(२), (३) व (४) सन २०१३ पर्यंत तहसिल कार्यालयातून संगणकीकृत गा.न.नं ७/१२ उतारे दिले जात होते त्यानंतर संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ चे अद्यावतीकरणाचे काम सुरु झाल्याने संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ उतारे देण्याचे बंद करण्यात आलेले होते. त्यावेळी देण्यात आलेल्या संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ उताऱ्यावर "सरकारी कामासाठी वापरावयाचे नाहीत" तसेच "पडताळणीच्या अधिन राहून" अशा प्रकारचे शिक्के मारुन गा.न.नं. ७/१२ चे उतारे दिले जात होते कारण त्यावेळी संगणकीकृत नोंदीचे अद्यावतीकरणाचे काम सुरु होते.

सद्य:स्थितीत सिंधुदुर्ग जिल्हयात संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ च्या अद्यावतीकरणाचे काम सुरु असून मूळ अभिलेखांवरुन पडताळणी करण्यात येत आहे. तसेच याबाबत वैभववाडी तालुक्याचे गा.न.नं. ७/१२ पडताळणीचे काम पूर्ण झाले असून त्याची सी.डी.जमाबंदी आयुक्त, पुणे कार्यालयाकडे पाठविण्यात आलेली आहे.

पाणीपुरवठा विभागाच्या अभियंत्याने आपल्या शेतात तारेचे कुपन घालत असतांना शासनाचे सर्व नियम डावलून मनमानी काम सुरु केल्याबाबत

(६) १२५४६ (०८-०४-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदुर रेल्वे (जि.अमरावती) येथील चांदूर भाग १ मध्ये येत असलेल्या एम.आर.गुलवाडे या पाणीपुरवठा विभागाच्या अभियंत्याने आपल्या शेतात तारेचे कुपन घालत असतांना शासनाचे

सर्व नियम डावलून मनमानी करुन काम सुरु केले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू व्यक्तीने धु-यावरील शासकीय नाल्यासह शेजारील शेताच्या धुऱ्यावरुनच कुंपन घालून बाजूच्या शेतावर अतिक्रमण करुन धुऱ्यावरील निबांच्या व पळसाच्या अनेक हिरव्या झाडांचीही बेकायदेशीर कत्तल केली आहे याबाबत संबंधित दोषी असणाऱ्या पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यावर काय कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१६-०२-२०१६) :(१) श्रीमती इंदुमती सु.राऊत तर्फे विवेक राऊत यांनी दि.१२/५/२०१४ रोजी श्री.एम.आर.गुलवाडे यांनी तारेचे कुंपण घातल्याबाबत तहसिल कार्यालय, चांदूर रेल्वे येथे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

(२) व (३) श्री.गुलवाडे यांनी शेताची मोजणी न करताच कंपाऊंड घातले होते. त्यामुळे सरकारी मोजणी केल्यानंतर शेतातील कंपाऊंड तोडण्यात येईल व त्याचा खर्च श्री.गुलवाडे यांच्याकडून वसूल करण्यात येईल. असे नायब तहसिलदार, चांदूर रेल्वे यांनी दि. २/६/२०१४ रोजी आदेश पारीत केले आहेत. तसेच ९ पळसाची झाडे अवैधरित्या तोडल्याबाबत श्री.गुलवाडे यांचेविरुध्द दिनांक २७/५/२०१५ च्या आदेशान्वये नायब तहसिलदार, चांदूर रेल्वे यांनी महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबतचा अधिनियम, १९६४ मधील कलम ४ अन्वये रु.९०० एवढा दंड केला असून सदर दंडाची वसूली करण्यात आली आहे.

नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर तालुक्यामधील बोरगाव (बुजुगी) व आदासा येथील अधिग्रहीत जमीनीचा मोबदला मिळाला नसल्याबाबत

(७) १५१९३ (०७-०४-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), डॉ.आशिष देशमुख (काटोल) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर तालुक्यामधील बोरगाव (बुजुगी) व आदासा येथील ३०० हेक्टर अधिग्रहीत जमीनीचा मोबदला अद्यापपर्यंत मिळाला नसल्याबाबत दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परीसरात मोठ्या प्रमाणात खनिज संपत्ती असल्यामुळे वेकोलीच्या प्रशासनाने कोळसा उत्खनन सुरु केल्याने पाण्याची पातळी सुध्दा फार खाली गेलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वेकोलीच्या प्रशासनाने बोरगाव (बुजुर्ग) येथील १८०.०३ हेक्टर व आदासा येथील १२९.९३ हेक्टर शेतजमीन कोळसा क्षेत्र अर्जन अधिनियम १९५७ ची धारा ९ ची उपधारा १ द्वारा अधिग्रहीत केली परंतू सदर शेतीच्या मोबदल्याची रक्कम आतापर्यंत शेतक-यांना वितरीत कण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांना शेतीच्या मोबदल्याची रक्कम अद्यापपर्यंत वितरीत करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२२-०२-२०१६) :(१) तपासाअंती आढळून आले नाही.
(२) नाही.
(३) होय. या जमिनीचा मोबदला अद्याप पर्यंत वितरीत करण्यात आलेला नाही.
(४) होय.
(५) जमिनीच्या मोबदल्याची मुल्यांकन प्रक्रिया सुरु असल्यामुळे रक्कम अद्यापपर्यंत वितरीत करण्यात आली नाही.

वाशिम जिल्ह्यातील मैराळडोह ता.मालेगांव येथील पडित जमीन भुमिहीन आदीवासी शेतकऱ्यांचे नावे करण्याबाबत

(८) १५३७२ (०७-०४-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्ह्यातील मैराळडोह ता.मालेगांव येथील भुमिहीन आदीवासी शेतकऱ्यांनी महसुल व वनविभागाच्या पडीत जमिनीवर १९७० ते २०१० या कालावधीत अतिक्रमण करून शेती करत असून त्या जमिनीची तलाठ्याकडून मोका पाहणी करून अहवाल देण्यासाठी दिनांक १० फेब्रुवारी, २०१५ पासून आमरण उपोषण सुरू केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अतिक्रमणीत जमिनी शेतकऱ्यांना त्यांचे नावे करून देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय व याबाबत शासनाची स्पष्ट भुमिका काय आहे ?

श्री. एकनाथराव खडसे (२४-०२-२०१६) :(१) श्री.महादेव धवसे, जिल्हा प्रमुख स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष व १७ जणांनी दलित, आदिवासी व भूमिहीन बेघर लोकांनी महसूल व वन विभागाच्या पडीत जमिनीवर शेती प्रयोजनासाठी १९७८-२०१४ या कालावधीत केलेल्या पेरणीच्या अनुषंगाने अतिक्रमणासंबंधी प्रत्यक्ष मोका पाहणी करुन पंचनामा अहवाल देण्यात यावा. अन्यथा आमरण उपोषणास बसावे लागेल असे निवेदन दिनांक १२/१/२०१५ रोजी दिले होते. तद्नंतर दिनांक १०/०२/२०१५ पासून श्री.वामनराव नामदेव मस्के यांचे नेतृत्वाखाली उपोषण सुरु झाले होते मात्र सदर उपोषण त्याच दिवशी मागे घेण्यात आले.
(२), (३) व (४) अतिक्रमणधारकांना शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.एलईएन-१०९०/प्र.क्र.१७२/ज-१, दि.२८ नोव्हेंबर, १९९१ मधील अटी व शर्तीची पुर्तता करण्यासाठी आवश्यक असणारे अतिक्रमणविषयक पुरावे सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. परंतु त्यानुसार आवश्यक कागदपत्रे अद्याप सादर झालेली नाहीत.

सरसमसवना, जवळगांव, हिमायतनगर (जि.नांदेड) या तीन चे मंडळाधिकाऱ्यांच्या बदलीमुळे जागा रिक्त असल्याबाबत

(९) १६९५६ (०६-०८-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सरसमसवना, जवळगांव, हिमायतनगर (जि.नांदेड) या तीन मंडळाचे मंडळाधिकाऱ्यांच्या पदोन्नतीवर अन्यत्र बदली होऊन एक महिन्याच्या वर कालावधी झाला असून त्यांच्या रिक्त जागी त्या त्या भागातील अनुभवी तलाठ्यांना मंडळाधिकाऱ्यांचा अतिरिक्त पदभार देण्यात आला असून मागील अनेक दिवसापासून नामधारी मंडळाधिकारी म्हणूनच सदर प्रभारी काम करीत असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव या प्रभारींना फेर फार नोदी घेण्याच्या अधिकाराबद्दल कसालाही प्रकारचा वरिष्ठाचा आदेश आला नसल्याने शेतक-यांची अनेक कामे खोळंबली असल्याने याबाबत शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१८-०२-२०१६) :(१) व (२) सरसमसवना, जवळगांव, हिमायतनगर (जि.नांदेड) या तीन मंडळाचे मंडळाधिकाऱ्यांची पदोन्नती झाली होती. सदर पदांचा कार्यभार त्या कार्यालयातील अनुभवी तलाठी यांना प्रभारी मंडळ अधिकारी म्हणून देण्यात आला होता. त्यानंतर लगेचच कार्यालयातील वरीष्ठ अव्वल कारकून यांना प्रभारी मंडळ अधिकारी म्हणून नेमण्यात आले असल्यामुळे कोणत्याही शेतकऱ्यांचे फेरफार नोंदणीचे काम प्रलंबित राहीलेले नाहीत. अद्याप पर्यंत कोणत्याही शेतकऱ्यांचे फेरफार नोंदणी करण्याचे काम तसेच इतर महसूल कामे प्रलंबित असल्याबाबतची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र राज्यातील शेतजमीनी संपादन करुन तेथे राहणाऱ्या कुटूंबियांना जागा नियमानुकूल करुन देण्याबाबत

(१०) १७०८५ (०६-०८-२०१५). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यातील विशेषतः धुळे नंदूरबार, नाशिक जिल्ह्यातील साक्री, नवापूर, सटाणा तालुक्यातील काही महसूल गांवे व मोठ्या वस्त्या/पाडे सरकारी गावठाण नसल्यामुळे खाजगी मालकांचा शेतात बऱ्याच वर्षापासून वस्ती करुन राहत असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साक्री तालुक्यातील महुबन, खिरणीपाडा कालदर, शेंदवड चावडीपाड, दरेगाव पैंकी आंबापाडा दरेगांवपैकी इ. गावांना गावठाण नसल्यामुळे ज्या शेतमालकांच्या शेतात घरे

आहेत ते शेतमालक शेतीतील घरे उठविणेबाबत संबंधित विभागाकडे वारंवार तक्रारी करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्याठिकाणी ३० ते ५० वर्षापेक्षा जास्त कालावधी पासून घरे आहेत त्याशेतजमीनी संपादन करुन नेहमीप्रमाणे तेथे राहणाऱ्या कुटूंबियांना जागा नियमानुकूल करुन देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१८-०२-२०१६) :(१), (२), (३) व (४) धुळे, नंदूरबार व नाशिक जिल्ह्यातील काही गावांमध्ये गावठाण नसल्यामुळे खाजगी मालकांच्या शेतात काहीव्यक्तींनी अतिक्रमण करुन घरे बांधून वस्ती केल्याचे काही प्रकरणात निदर्शनास आले आहे. असेविभागीय आयुक्त, नाशिक यांनी अहवालाद्वारे कळविले आहे. त्यापैकी धुळे जिल्ह्यात खाजगी शेतजमिनीवर अतिक्रमण करुन बांधलेली शेतीतील घरे उठविण्यासंदर्भात जिल्हाधिकारी, धुळे यांच्याकडे तक्रार अर्ज प्राप्त नाहीत. परंतु सदर अतिक्रमण धारकांची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झालेला नाही. त्यामुळे कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील आक्सा, मालवणी ता. बोरीवली येथील जमीन इंडिया फार्म्स कंपनीची शासनाने लीज रद्द करुन देखील सदर जमीनीचा ताबा शासनाला मिळाला नसल्याबाबत

(११) १९४७८ (०६-०८-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील आक्सा, मालवणी ता. बोरीवली येथील सर्व्हे क्र.१४ अ, ६१,१६,१६,५१ हि जमीन शेतीसाठी इंडिया फार्म्स हया कंपनीला दिली होती परंतु सदर कंपनी शेती करत नसल्याने शासनाने २००४ रोजी मध्ये लीज रद्द करुन देखिल सदर जमीनीचा ताबा शासनाला मिळाला नसल्याचे माहे मे २०१५ मध्ये स्पष्ट झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिन किती एकरची आहे व सातबारा वर कुणाची मालकी आहे,

(३) असल्यास, सदर जमिनीवर मोठेमोठे स्टुडिओ बांधुन शूटिंगसाठी भाडयाने दिले जातात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर जमिनीचा ताबा घेण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची काय कारण आहे ?

श्री. एकनाथराव खडसे (०६-०२-२०१६) :(१), (२), (३) व (४) मौजे मालवणी, आक्से व मार्वे या गावातील प्रश्नाधीन जमिनीचे क्षेत्रफळ ११४ एकर १८ गुंठे ४ आणे असून ती अधिकार अभिलेखात महाराष्ट्र शासनाच्या नावे आहे. सदर शासकीय जमीन मे.इंडिया फार्मर्स प्रा.लि. या संस्थेस दि. १/८/१९५० पासून ९९९ वर्षाचे भाडेपट्टेदार मे.इंडिया फार्मर्स प्रा.लि. यांनी मुख्यतः

ती जमीन २० वर्षात नवसाध्य करुन लागवाडीसाठी योग्य करणे आवश्यक होते. परतु संस्थेने सदर जमिनी विहीत मुदतीत नवसाध्य न केल्यामुळे व जमिनीचा वापर अनधिकृतपणे बिनशेती प्रयोजनार्थ केल्यामुळे शर्तभंगाची कार्यवाही करण्यात येवून सदर जमीन सरकार जमा करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक २६/४/१९९३ रोजी पारीत केलेले आहेत.

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या दिनांक २६.४.१९९३ रोजीच्या आदेशाविरुध्द मे.इंडिया फार्मर्स प्रा.लि. यांनी अपर आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे अपिल दाखल केले होते. सदर अपिलावरील निर्णयानंतर सदरचे प्रकरण तत्का मा.मंत्री (महसूल), मा. मुंबई उच्च न्यायालय व पुढे मा.सर्वोच्च न्यायालयात सुरु राहिले. अंतिमतः मे.इंडिया फार्मर्स प्रा.लि. यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात सिव्हील अपिल क्र. ५९४७/२००७ दाखल केले. त्यामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २४.२.२०११ रोजी प्रस्तुत प्रकरणी ''जेसे थे'' परिस्थिती ठेवण्याचे आदेश देऊन प्रकरण मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाकडे वर्ग केले आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार प्रश्नांकित जागेवरील परिस्थिती ''जेसे थे'' ठेवणे आवश्यक आहे.

सदर प्रकरण आता मा.मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

सदर जमिनीवर मोठेमोठे स्टुडिओ बांधून शुटींगसाठी भाड्याने दिले जात असल्याचे निदर्शनास आले नाही.

(५) प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

भुसावळ येथील दीपनगर औष्णिक केंद्रातील निकृष्ट कोळसा, टेंडरिंगमधील घोटाळे, रिजेक्ट कोलचे वाढते प्रमाण यामुळे सदरचा प्रकल्प बंद पडल्याबाबत

(१२) १९९९४ (१०-०८-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ येथील दीपनगर औष्णिक केंद्रातील निकृष्ट दर्जाचा कोळसा, टेंडरिंगमधील घोटाळे, रिजेक्ट कोलचे वाढते प्रमाण यामुळे सदरचा प्रकल्प बंद पडल्यासंदर्भात मा.ऊर्जामंत्री प्रकल्पस्थळी भेट घेऊन भ्रष्ट अधिकारी व ठेकेदारांवर कारवाई करणार असल्याची माहिती मा.पालकमंत्री, जळगांव यांनी माहे एप्रिल, २०१५ च्या सुमारास दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने बंद पडलेला प्रकल्प सुरु करण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.

भुसावळ औष्णिक केंद्रातील कोणताही संच निकृष्ट दर्जाचा कोळसा, टेंडरिंगमधील घोटाळे, रिजेक्ट कोलचे वाढते प्रमाण या कारणामुळे बंद करण्यात आला नव्हता, संच क्र. १ व २ विविध बाह्य कारणामुळे काही कालावधीसाठी बंद होते सद्य:स्थितीत सदर संच सुरळीतपणे सुरु आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती जिल्ह्यातील बी.टेन जमिनीच्या खरेदी विक्री संदर्भात स्वयंस्पष्ट सुचना असणारा शासन निर्णय निर्गमित करण्याबबात

(१३) २०४५९ (१०-०८-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील बी-टेन जमिनींच्या खरेदी विक्रीसंदर्भात स्वयंस्पष्ट सूचना असणारा शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत स्थानिक आमदार अचलपूर यांनी दिनांक २८ मे, २०१५ रोजी पत्र लिहून शासनाकडे मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली आहे,वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१६-०२-२०१६) :(१) याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री (महसूल) यांना दि. १९ मे, २०१५ च्या पत्रान्वये विनंती केली आहे.
(२) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडून अभिप्राय घेण्यात आले आहेत. त्यांनी सदर अभिप्रायात काही मुद्यांबाबत मार्गदर्शन करण्याची विनंती केली आहे. त्या अनुषंगाने त्याविषयी शासन स्तरावर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भ्वत नाही.

महाराष्ट्र व तेलंगणा राज्याच्या सिमेवरील जिवती तालुक्यतील (जि.चंद्रपूर) १४ गावांचा भुमि अभिलेख तयार करण्यासाठी मोजणी करण्याबाबत

(१४) २०९२८ (१०-०८-२०१५). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.संजय पोतनीस (कलिना) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र व तेलंगणा राज्याच्या सिमेवरील जिवती तालुक्यतील (जि.चंद्रपूर) १४ गावांचा भुमि अभिलेख तयार करण्यासाठी मोजणी करण्याबाबत शासनाने दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी जमाबंदी आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला आहे काय,
(२) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व निर्णय केव्हा घेण्यात येणार आहे ?

श्री. एकनाथराव खडसे (२५-०२-२०१६) :(१), (२) व (३) जमाबंदी आयुक्त, पुणे यांचा महाराष्ट्र व तेलंगणा राज्याच्या सिमेवरील जिवती तालुक्यातील (जि.चंद्रपूर) १४ गावांच्या भूमि अभिलेख तयार करण्यासाठी मोजणी करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून सद्यस्थितीत सदरचे प्रकरण शासन स्तरावर विचाराधीन आहे.

पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील प्रशासकीय इमारतीच्या जागेतील भाडेकरुंच्या स्थलांतराचा प्रलंबित प्रश्न मार्गी लागण्याबाबत

(१५) २१३५३ (०६-०८-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालये एकाच ठिकाणी व्हावी या दृष्टीकोनातून उभारण्यात येणाऱ्या प्रशासकीय इमारतीच्या जागेतील भाडेकरुंच्या स्थलांतराचा प्रलंबित प्रश्न मार्गी लागण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासकीय इमारतीच्य उभारणीच्या कामात गती मिळण्यासाठी व प्रशासकीय इमारतीचे बांधकाम लवकरात लवकर पुर्ण होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, कार्यवाहीचे स्वरुप काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०१-०३-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) नवीन प्रशासकीय इमारतीमधील गाळेधारकांनी भाडेकरी हक्कात असणाऱ्या मिळकतीच्या ताब्याकरीता महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायदा १९९९ चे कलम १५ व १६ मधील तरतुदीखाली दिवाणी न्यायालय पनवेल येथे दावे दाखल केले आहेत. मा.न्यायालयाने सदरच्या दाव्यात हा गुणवत्तेवर दावा चालवून संपेपर्यत वादींच्या (भाडेकरुंच्या) ताब्यातील गाळे काढून घेऊ नये असा आदेश दि. १९/०९/२०१४ रोजी देण्यात आलेला आहे. सदर दावा मा.न्यायालयात अद्याप प्रलंबित आहे.

कामगारांची मेडिक्लेम पॉलीसी तीन्ही वीज कंपन्यांनी ऑरिएंटल इन्शुरन्स कंपनीकडे दुसऱ्या टप्यातील पॉलीसीचे पैसे न भरल्यामुळे पॉलीसी बंद केल्याबाबत

(१६) २३३९६ (०६-०८-२०१४). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती या तीन वीज कंपन्यांमध्ये कार्यरत असलेल्या तब्बल ८७ हजार वीज कामगारांची मेडिक्लेम पॉलीसी तीन्ही वीज कंपन्यांनी ऑरिएंटल इन्शुरन्स कंपनीकडे दुस-या टप्यातील पॉलीसीचे पैसे न भरल्यामुळे बंद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीन्ही वीज कंपन्यांची मेडिक्लेम पॉलीसीचे पैसे न भरण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, कामगारांसाठी उपयुक्त असलेली मेडिक्लेम पॉलीसी पुन्हा सुरु करण्याबाबत वा पर्यायी योजना आखण्याबाबत तीन्ही कंपन्यांच्या व्यवस्थापनाने निर्णय घेतला आहे काय,

(४) असल्यास, अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) कंपनी व्यवस्थापन व कर्मचारी संघटना प्रतिनिधी यांच्यातील सामंजस्य करारानुसारा तिन्ही कंपन्यातील कर्मचाऱ्यांकरिता वैद्यकीय विमा योजना दि.०१.०१.२०१५ पासून सुरु करण्यात आली आहे. वैद्यकीय विम्यापोटी रु.२० कोटी इतकी रक्कम व्यवस्थापनाने देण्याचे मान्य केले असून, प्रतिपुर्ती रक्कम रु.२० कोटीपेक्षा अधिक वाढल्यास, विम्याच्या हप्ताची अतिरिक्त रक्कम कर्मचारी मिळून भरतील, असे मान्य करण्यात आले आहे.

दि.०४.०५.२०१५ पर्यंत वैद्यकीय विमा लाभाची रक्कम ९०.४१% इतकी झाल्याने, विमा योजना चालू ठेवण्यासाठी अधिकचा विमा हफ्ता जमा न केल्याने, विमा कंपनीने दि.०५.०५.२०१५ पासून वैद्यकीय विम्याच्या लाभास मंजूरी देणे थांबविले होते. तातडीची बाब म्हणून तिन्ही कंपन्यांच्यावतीने महावितरण कंपनीने रु. ५ कोटी एवढी रक्कम दिनांक ०८.०५.२०१५ रोजी जमा करण्यात आली.

विमा कंपनीने माहे जानेवारी, २०१५ ते दि.२५ मे, २०१५ या कालावधीतील वैद्यकीय विमा लाभाच्या प्रकरणांची संख्या लक्षात घेऊन डिसेंबर, २०१५ पर्यंत योजना सुरु ठेवण्यासाठी रु.३० कोटी एवढी रक्कम जमा करण्याचा प्रस्ताव सादर केला होता.

त्यानुसार, महावितरण कंपनीकडून तिन्ही कंपन्यांच्यावतीने रु.२० कोटी एवढी रक्कम अदा करण्यात आली असून, वैद्यकीय विमा योजना दि.१५.०७.२०१५ पासून सुरु करण्यात आली आहे.

जाफ्राबाद तालुक्यातील (जि.जालना) माहोरा येथील विज वितरण कंपनीच्या मनमानी कारभारामुळे गावातील भटके गोसावी वस्ती अंधारात असल्याबाबत

(१७) २३७९५ (०६-०८-२०१५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जाफ्राबाद तालुक्यातील (जि.जालना) माहोरा येथील विज वितरण कंपनीच्या मनमानी कारभाराला वैतागले असून गेल्या वीस दिवसांपासून गावातील भटके गोसावी वस्ती अंधारात आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास येथील कनिष्ठ अभियंता मुख्यालयात न येता औरगाबाद येथे राहूनच कारभार पाहत असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार दोषीवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०३-२०१६) :(१) हे खरे नाही. मौजे माहोरा येथील भटके गोसावी वस्ती ही धाड रोडच्या बाजूला असून ती ३५-४० घरांची निवासी वस्ती आहे. तेथील घरांना BPL अंतर्गत वीजपुरवठा करण्यात आलेला होता. परंतु त्यापैकी ज्या वीज ग्राहकांनी थकीत विद्युत देयके भरलेली नाहीत. त्या ग्राहकांचा वीज पुरवठा महावितरण कंपनीकडून मार्च, २०१५ मध्ये बंद करण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

जालना जिल्ह्यातील जिल्हा प्रशासनात कामावरुन कमी केलेल्या कर्मचाऱ्याला पदावर घेण्यात आल्याबाबत

(१८) २३७९६ (०६-०८-२०१५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्ह्यातील जिल्हा प्रशासनात कोतवाल व अनुकंप संवर्गातून पदोन्नतीद्वारे शिपाई पद भरणे असताना कामावरुन कमी केलेल्या कर्मचाऱ्याला पदावर घेण्यात आल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिपायांच्या रिक्त जागा भरण्याकरिता पदावनीत कोतवाल, अनुकंपा पदोन्नती देण्याकरिता आदेश काढून या पदावर श्री.रामेश्वर लक्ष्मणराव दळवी याची पदोन्नतीवर नियुक्ती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, श्री.दळवी हे प्रत्यक्षात कोतवाल पदावर कार्यरत नसताना व ते उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना येथे विनावेतन प्रतिलिपिक म्हणून कार्यरत होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोला चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार शासन स्तरावर पुढे काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१८-०२-२१०६) :(१), (२), (३), (४) व (५) जालना जिल्ह्यातील कोतवाल व अनुकंपा संवर्गातून पदोन्नतीद्वारे शिपायांची पदे भरतांना कामावरुन कमी केलेल्या कर्मचाऱ्यांना घेण्यात आल्याची तक्रार दि. ८/५/२०१५ रोजी प्राप्त झालेली आहे.

श्री.रामेश्वर लक्ष्मणराव दळवी या व्यक्तीस कोतवाल वा अनुकंपा संवर्गातून शिपाई पदावर पदोन्नती देण्यात आलेली नाही. मात्र, श्री.दळवी हे विनावेतन उमेदवार (कॉपीस्ट) म्हणून कार्यरत होते. तद्नंतर त्यांना शिपाई पदावर नियुक्ती देण्यात आली. तसेच, श्री.दळवी यांना शिपाई पदावरुन लिपिक पदावर व लिपिक पदावरुन अव्वल कारकून पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे.

सांगली जिल्ह्यामधील शेती पंपाच्या विज कनेक्शनसाठी बराच कालावधी लागत असल्याबाबत

(१९) २५६६८ (१०-०८-२०१५). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यामधील शेती पंपासाठी विशेषत: लांबच्या विहिरीसाठी विज कनेक्शन देताना ३ ते ४ वर्षाचा कालावधी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार शेती पंपासाठी वीज कनेक्शन त्वरीत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०३-२०१६) :(१) अंशत: खरे आहे सांगली जिल्ह्यात मागील तीन वर्षात २,८९,४७ कृषीपंपाना नवीन वीज जोडण्या देण्यात आलेल्या आहे. मार्च, २०१५ अखेर सांगली जिल्ह्यात एकूण ११३०७ कृषीपंप ग्राहक पैसे भरुन प्रलंबित आहेत. सन २०१५-१६ मध्ये ॲक्टोबर अखेर ३४७९ इतक्या कृषीपंपाना नवीन वीज जोडण्यात देण्यात आलेल्या आहेत.

(२) पायाभूत आराखडा-२ व डीपीडीसी योजनेत अनुक्रमे ३३३८ व २२५ कृषीपंनाना नवीन वीज जोडण्याची कामे प्रस्तावित आहेत.

(३) कंत्राटदारांना प्रलंबित कृषीपंप अर्जदारांची यादी देण्यात आली आहे. सदर कंत्राटदारांना कृषीपंपाची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याबाबतचे निर्देश महावितरण कंपनीमार्फत देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भूमी अभिलेख खात्याने चुकीच्या पध्दतीने केलेल्या सर्वेक्षणामुळे पुणे जिल्हातील आंबेगाव, खेड, जुन्नर तालुक्यातील नाशिक महामार्गाचे काम रेगाळले असल्याबाबत

(२०) २६२६३ (१०-०८-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूमी अभिलेख खात्याने चुकीच्या पध्दतीने केलेल्या सर्वेक्षणामुळे पुणे जिल्हातील आंबेगाव, खेड, जुन्नर तालुक्यातील नाशिक महामार्गाचे काम रेगाळले असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये निदर्शनास झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्षभरात शेतक-याच्या हरकती आणि मोबदला न मिळाल्याने पुणे जिल्ह्यात केवळ ५६ कि.मी. पैकी साडेतीन कि.मी पर्यंत काम झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१८-०२-२०१६) :(१) नाही.

भूमी अभिलेख खात्याने चुकीच्या पध्दतीने मोजणी केल्यामुळे काम रेंगाळलेले नाही, रस्त्याच्या भूसंपादनाला असलेल्या लोकांच्या तीव्र विरोधामुळे काम रेंगाळलेले आहे.
(२) नाही.

वर्षभरात संबंधित खातेदारांकडून २७८ हरकती प्राप्त झालेल्या असून कलम ३सी(२) अन्वये तालुक्याच्या ठिकाणी सुनावणी ठेवून त्याचे निकालपत्र कळविण्यात आले आहे. नुकसान भरपाई मिळण्यासाठी ज्या खातेदारांनी कागदपत्रे सादर केलेली आहेत. त्यांना नियमानुसार मोबदला अदा करण्यात येत आहे.
(३) व (४) होय.

याबाबत विभागीय आयुक्त, पुणे विभाग व जिल्हाधिकारी, पुणे यांनी प्रकल्प संचालक, नाशिक व संबंधित विभागांच्या वेळोवेळी आढावा बैठका घेऊन रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत सूचना दिल्या आहेत व मार्गदर्शन केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगातर्फे झालेल्या सुनावणीत राज्य वीज महावितरण कंपनीच्या वतीने वीज दरवाढीबाबतचा प्रस्ताव दाखल केल्याबाबत

(२१) २७०८९ (१०-०८-२०१५). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवनात महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगातर्फे दिनांक १ एप्रिल, २०१५ रोजी झालेल्या सुनावणीत राज्य वीज महावितरण कंपनीच्या वतीने वीज दरवाढीबाबतचा प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या दरवाढीचे स्वरूप काय आहे व या कोट्यावधी रुपयांच्या दरवाढी प्रस्तावास या सुनावणीत मोठया प्रमाणात नागरिकांनी व विविध संघटनानी सहभागी होऊन विरोध केला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेतला आहे, वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०३-२०१६) :(१), (२) व (३) हे खरे आहे. महावितरणने आर्थिक वर्ष २०१३-१४ ते आर्थिक वर्ष २०१४-१५ या कालावधीसाठीची बहुवर्षीय वीज याचिका विद्युत नियामक आयोगाकडे विद्युत अधिनियम, २००३ मधील तरतुदी व बहुवर्षी वीजदर विनियमानुसार दिनांक ३.२.२०१५ रोजी दाखल केली होती. सदर याचिकेद्वारे एकूण ४,७१७ कोटी रुपयांची महसुली तूट वसुल करण्यासाठी परवानगी आयोगाकडे करण्यात आली व साधारणत: ८% वीजदर वाढ प्रस्तावित केली होती.

सदर याचिकेवर दिनांक १८.३.२०१५ ते दिनांक १०.४.२०१५ या कालावधीमध्ये सहा महसुली मुख्यालयांच्या ठिकाणी जाहीर जनसुनावणी घेण्यात आली. तद्नंतर आयोगाने दिनांक २६.६.२०१५ रोजी वीजदर आदेश दिला, त्यानुसार आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता वीजदरात एकूण सरासरी ५.७५ टक्क्यांची कपात केलेली आहे. सुधारित वीजदरांची अंमलबजावणी १.६.२०१५ पासून करण्याचे आदेश आयोगाने दिलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

केडगाव (ता.दौंड, जि.पुणे) येथील विभागीय कार्यालयाचे विभाजन करण्याबाबत

(२२) २८२३८ (२६-१०-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तालुका दौंड जि.पुणे येथील केडगाव विभागीय कार्यालयाचे विभाजन करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी मा.उर्जा मंत्री यांना माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केडगाव या विभागीय कार्यालयाचे विभाजन करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०२-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.

(२) नवीन विभागीय कार्यालय निर्मितीसाठी किमान १,२०,००० वीज ग्राहक संख्या असणे आवश्यक आहे. सदर मानकांनुसार केडगाव विभागीय कार्यालयाचे विभाजन करुन, कडेगाव व शिरुर हे विभाग तयार करण्याकरीता ग्राहक संख्या कमी पडत होती.

तथापि, दि. १४.१०.२०१५ च्या ठरावानुसार फक्त वीज ग्राहक संख्या हा एकमेव निकष विचारात न घेता, ग्रामीण भागातील सेवाक्षेत्र मुख्यालयापासूनचे अंतर, प्रवासाला लागणारा वेळ व महसूल वसूली इत्यादी निकष विचारात घ्यावेत, असे आदेशीत करण्यात आले. त्यानुसार केडगाव विभागीय कार्यालयाचे विभाजन करण्याबाबत नव्याने पडताळणी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

महानिर्मितीच्या वीज उत्पादक खर्चामध्ये होणाऱ्या वाढीचा भार वीज ग्राहकांवर टाकण्यात येत असल्याबाबत

(२३) २८२८४ (२२-१२-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या निर्देशानुसार कोळशावरील वीज प्रकल्पातून स्थापित क्षमतेच्या ८० टक्के वीज उत्पादन होणे आवश्यक असताना महानिर्मितीच्या कोळश्यावर चालणाऱ्या ७४८० मेगावॅटच्या ७ प्रकल्पातून केवळ ५५ ते ५८ टक्केच वीज निर्मिती होत असून सर्व वीज प्रकल्प चालवूनही क्षमतेच्या अर्धीच वीज निर्मिती होत असल्याने मोठ्या उत्पादन खर्चामुळे वीजदर अवाचे सव्वा होत असून वीजदर वाढीच्या माध्यमातून, उत्पादन खर्च वीज ग्राहकावर लादला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणला खाजगी कंपन्यांकडून सुमारे तीन ते सव्वातीन रुपये प्रति युनिट या दराने वीज मिळत असताना, महानिर्मितीच्या एका युनिटसाठी ४ रु. २० पैसे द्यावे लागत असल्याने सन २०१३-१४ या वर्षात वीज ग्राहकाकडून तब्बल ३४०० कोटी रु. अतिरिक्त वसूल करण्यात आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे अनुषंगाने वीजदर कमी करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०२-२०१६) :(१) महानिर्मिती कंपनीच्या वीजनिर्मिती केंद्रातून निर्माण होणाऱ्या वीजेवरील दर हा राज्य वीज नियामक आयोगाच्या वीजदर विनियम, २०११ नुसार विविध संचांसाठी आखून दिलेले कामगिरी निर्देशांक व वीजदराचे इतर निर्देशांक याप्रमाणे निर्धारित करण्यात येतो. त्यामुळे महानिर्मिती कंपनीच्या संचाची विजनिर्मिती कमी झाली तरी कोणताही अतिरिक्त भार ग्राहकांवर लादण्यात येत नाही.

(२) महानिर्मिती कंपनीचा सन २०१३-१४ करीता वीजदर रु. ४.२० प्रती युनिट नसून रु.३.५६ प्रति युनिट इतका होता. तसेच महानिर्मिती कंपनीकडून दिर्घ मुदतीच्या कराराद्वारे संपूर्ण वीज महावितरण कंपनीस पुरविण्यात येते. खाजगी कंपन्याकडून मिळणारी वीज ही अल्प मुदतीच्या कराराद्वारे अत्यल्प प्रमाणात असल्यामुळे महानिर्मितीच्या दिर्घ मुदतीद्वारे उपलब्ध होणाऱ्या वीजेच्या दराची अल्पमुदतीच्या अत्यल्प प्रमाणात मिळणाऱ्या वीजदराशी तुलना करणे संयुक्तिक नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्ह्यामध्ये मंजूर असलेल्या १३२/३३ के.व्ही. अति उच्चदाब उपकेंद्रांची स्थापना करण्याबाबत

(२४) २८४५१ (०८-०१-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यामध्ये १२ ठिकाणी मंजूर असलेल्या १३२/३३ के.व्ही. अति उच्चदाब उपकेंद्रांची स्थापना करण्याचे प्रलंबित असल्यामुळे सदर अति उच्चदाब उपकेंद्र निर्माण करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे व महापारेषण कार्यालयाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, याप्रकरणी प्रलंबित अति उच्चदाब उपकेंद्रांची स्थापना करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०२-२०१६) :(१) नाशिक जिल्ह्यामध्ये चार १३२/३३ के.व्ही. उपकेंद्रे उभारण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीकडून करण्यात आली आहे.

(२) मागणी करण्यात आलेल्या अंदरसूल, पाटोदा, विंचूर व नांदगाव अशा चार १३२/३३ के.व्ही. उपकेंद्रापैकी अंदरसूल व नांदगांव उपकेंद्राची सध्या आवश्यकता नसल्याचे महावितरण कंपनीने कळविले आहे.

विंचूर उपकेंद्राबाबत प्रस्ताव महावितरण कंपनीकडून अद्यापी अप्राप्त आहे. तथापि, भविष्यात या उपकेंद्राच्या आवश्यकतेबाबत महावितरण कंपनीकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यास तांत्रिक अभ्यासाद्वारे सुसाध्यता (Feasibility) तपासून निर्णय घेण्यात येईल.

पाटोदा उपकेंद्राऐवजी ३३ के.व्ही. वाहिन्यांची पुनर्रचना करण्याबाबत महापारेषण कंपनीकडून महावितरण कंपनीस कळविण्यात आले आहे. तसेच सदरहू उपकेंद्राच्या सुसाध्यतेबाबत महापारेषण कंपनीमार्फत पडताळणी सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अखिल भारतीय मच्छिमार खलाशी संघाने ससून डॉक, कुलाबा, मच्छिमार खलाशांच्या समस्यांबाबत दिलेले निवेदन

(२५) २८७०१ (२३-१२-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अखिल भारतीय मच्छिमार खलाशी संघ, ससून डॉक, कुलाबा, मुंबई या संघटनेने मच्छिमार खलाशांच्या समस्यांबाबतचे निवेदन संबधित अधिकाऱ्यांकडे दि.८.७.२०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनात राज्यात खलाशांना कुठल्याही समुद्र किनारपट्टीच्या बंदरात मच्छि विकण्याचा परवाना मिळावा, पर्सनेट धारकांना पर्सनेटचा परवाना मिळावा, वर्षासाठी

दिलेला डिझेल कोटा पूर्वीप्रमाणे एकदाच मंजूर करावा पूर्ण वर्षभर वापरण्यास नौका मालकांस मुभा असावी, डिझेल परतावा मच्छिमारांना दर महिन्याला मिळवून देण्यास शिफारस करावी, खलाशी मासेमारी करतेवेळी मृत्यू पावल्यास शासनाची मदत लवकरात लवकर मिळावी, मल्फी, गोवा, एरावल या बोटींना राज्याच्या हद्दीत मासेमारी फिशींग करण्यासाठी बंदी करावी, अशा मागण्या केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागण्यांसदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०३-०३-२०१६) :(१) होय.

(२) होय.

(३) महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ नुसार नौका मालकाने घोषित केलेल्या मूळ बंदरातून मासेमारी नौका चालविणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने घोषित केलेल्या बंदरातूनच मासेमारीसाठीचा परवाना देण्यात येतो. मासेमारी व्यवसायातील विविध घटकांचे विशेषत: पारंपारीक मच्छीमारांचे हितसंबंध जपणे व मत्स्यसाठ्यांचे जतन करण्यासाठी शासनाने पर्ससीन पध्दतीच्या मासेमारीवर नियंत्रण आणणसाठी उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला असून दिनांक ५.२.२०१६ च्या राजपत्रात आदेश प्रसिध्द करण्यात आले आहे. डिझेल कोटा मंजूरीबाबत दिनांक १४.१.१९९७ च्या पत्रानुसार आवश्यक डिझेल कोटा मंजूर करण्यात येतो. डिझेल वाटपात कुठलाही गैरव्यवहार होऊ नये व डिझेल वापरावर पूर्णत: नियंत्रण रहावे. यासाठी त्रैमासिक डिझेल कोटा वाटप करण्यात येतो. मच्छिमारांना डिझेल प्रतिपूर्ती उपलब्ध तरतूदीनुसार करण्यात येते. खलाशी मासेमारी करताना मृत्यू झाल्यास सदर खलाशाच्या वारसास, मासेमार संकट निवारण निधी या योजनेतून अर्थसहाय्य देण्यात येते. महाराष्ट्र सागरी कायद्यातंर्गत, राज्याच्या जलधीक्षेत्रात इतर राज्यातील मासेमारी करण्याऱ्या नौकांवर कारवाई केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील चंद्रपूर, भुसावळ, कोराडी, परळी आणि खापरखेडा विद्युत केंद्रातील नवीन प्रकल्प उभारणीस दिरंगाई केल्याबाबत

(२६) २८९१० (११-०१-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील चंद्रपूर, भुसावळ, कोराडी, परळी आणि खापरखेडा विद्युत केंद्रातील नवीन प्रकल्प उभारणीत दिरंगाई करणाऱ्या बिजीआर, सुनील हाय टेक व अन्य दोषी कंत्राटदार कंपन्यांची सर्व कामे RISK and COST च्या आधारावर काढून घेवून या कंपन्या काळ्या यादीत टाकण्याबाबत विधानसभा सदस्य अचलपूर यांनी दिनांक ११ ऑगस्ट, २०१५ रोजी शासनास पत्र लिहून मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) नसल्यास चौकशीच्या अनुषंगाने या कंपन्यांची कामे काढून घेवून त्यांना काळ्या यादीत टाकण्याबाबतची कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०२-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) महानिर्मिती कंपनीकडून प्रकल्पाच्या कामाचा वेळोवेळी आढावा घेण्यात येत असून कामाची अपेक्षित गती न आढळल्यास कंत्राटदारास समज देऊन अत्यंत आवश्यक कामे कंत्राटदाराच्या जोखीम व खर्च (Risk & Cost) यावर त्याच क्षेत्रातील दुस-या एजन्सीकडून करण्याबाबत निर्णय घेण्यात येतो.

चंद्रपूर व परळी प्रकल्पातील अनुक्रमे मे.बीजीआर व मे.सुनील हायटेक यांना दिलेली कोळसा हाताळणी यंत्रणेची कामे विलंबाने झाल्यामुळे सदर कामे त्यांच्याकडून काढून घेण्यात आली असून ही कामे मे. एलीकोन कंपनीकडून करुन घेण्यात येत आहेत. तसेच कोराडी प्रकल्पाच्या मे. लॅन्को यांना दिलेले कुलिंग टावरचे काम गैमन इंडिया कंपनीकडून करुन घेण्यात येत आहे. या कंपन्यांची सर्वच कामे Risk & Cost च्या आधारे काढून घेणे योग्य नाही कारण उर्वरित संयंत्राच्या कंत्राटांतर्गत AHP, CHP, WTP, FOH, FFS इत्यादी कामे समाविष्ठ असतात, तथापि, कंत्राटातील अटी व शर्तीनुसार विलंबाबाबतची दंडात्मक कारवाई महानिर्मिती कंपनीकडून करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे महापालिकेच्या भुसंपादनाचे जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाबाबत

(२७) २९०३२ (२३-१२-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महापालिकेच्या वतीने विकास आराखडा(डीपी)१९८७ मध्ये मंजूर करण्यात आला. त्यामध्ये रस्ते, घनकचरा व्यवस्थापन, उद्याने, प्राथमिक शाळा, क्रीडांगण यासाठी आरक्षित असलेल्या जागांचे भूसंपादन अत्यंत धीम्या गतीने सुरु असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक विकासकामांना यामुळे नुकसान सहन करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, महापालिकेचे भूसंपादनासाठी जिल्हाधिकारी यांचेकडे २०७ कोटी रुपये पडून असल्याचे निदर्शनास आले खरे आहे काय,
(४)असल्यास जिल्हाधिकारी पुणे यांचे वतीने ३५ वर्षात केवळ ११० हेक्टर जमिनिचेच भूसंपादन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, जिल्हाधिकारी कार्यालयाकडे भुसंपादनाचे प्रलंबित असलेल्या अनेक प्रस्तावावर शासनाने तातडीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२३-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) २०७ कोटी रुपये पडून आहेत हे खरे नाही. PLA मध्ये जमा २१० कोटी रुपयांपैकी ताबे झालेल्या प्रकरणी १६७ कोटी रुपयांचे वाटप चालू आहे व प्रगतीपथावर २५१ प्रकरणात ४३ कोटी रुपये मनपाकडून जमा आहेत. तसेच याउलट निवाडे जाहीर करण्यावर प्रलंबित २२ प्रकरणी ८३० कोटी रुपये इतकी रक्कम मनपाकडूना यावयाची आहे.
(४) विशेष भूमी संपादन अधिकारी क्र. १५ पुणे या कार्यालयाकडून १०८.७८ हेक्टर विशेष भूमी संपादन अधिकारी क्र. १६, पुणे या कार्यालयाकडून १६८.१६ हेक्टर अशा एकूण २७६.९४ हेक्टर जमिनीचे संपादन करण्यात आले आहे.
(५) व (६) जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयातील सर्व प्राप्त प्रकरणात कार्यवाही सुरु आहे.

छपरावरील सौर फोटो व्होल्टॅक यंत्राना नक्त मापन करण्यासाठी लागणारे वितरण जाळे/ग्रिड यांच्याशी आंतरजोडणी, मानके आणि सुरक्षिततेची वृद्धी करण्याबाबत

(२८) २९२१९ (२३-१२-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (छपरावरील सौर फोटो व्होल्टॅक यंत्रानाकरिता नक्त मापन) विनियम, २०१५ दिनांक १० सप्टेंबर, २०१५ रोजी जाहीर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या महत्वाकांक्षी धोरणानुसार राज्यात अपारंपारिक स्त्रोतांपासून मोठ्या प्रमाणात वीज निर्माण केली जाणार असून साधारण नक्त मीटर प्रणालीचा फायदा प्रत्येक ग्राहकाला मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेअंतर्गत उस्मानाबाद सारख्या शहरात संबंधित वितरण जाळ्याशी यंत्रणेची जोडणी करण्यासाठी लागणारे वितरण जाळे/ग्रिड यांच्याशी आंतरजोडणी, मानके आणि सुरक्षिततेची वृद्धी करण्यासाठी शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०२-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) या विनिमयास अनुसरुन छतावरील सौर फोटो व्होल्टॅक यंत्रणा महावितरणचे वितरण यंत्रणेशी जोडणी देण्याची कार्यपध्दती सर्व क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात आलेली आहे. याबाबत वाणिज्यिक परिपत्रक क्र. २५८ सुध्दा निर्गमित करण्यात आलेले आहे. सदर कार्यपध्दती व परिपत्रक महावितरणचे संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहे. ग्राहकांचे अर्ज स्वीकारुन प्रत्यक्ष जागेचे सर्वेक्षण करण्याची सूचना सर्व क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील देवस्थान व इनाम जमिनीबाबत शासनाने त्वरीत निर्णय घेवून या जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावावर करण्याबाबत

(२९) २९४४३ (०८-०१-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील देवस्थान व इनाम जमिनीबाबत शासनाने त्वरीत निर्णय घेवून या जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावावर कराव्यात या मागणीसाठी दिनांक २ सप्टेंबर रोजी सांगली येथे रस्तारोको आंदोलन करणार असल्याचे एका संघटनेने जाहिर केले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास याप्रकरणी, शासनाने निर्णय घेवून सदर जमिनी कसणाऱ्यांच्या नावावर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०३-०३-२०१६) :(१), (२) व (३) महाराष्ट्र राज्य किसान सभा, सांगली या संघटनेने जिल्हाधिकारी, सांगली यांना दि.०२/०९/२०१५ रोजी एक निवेदन सादर केले होते. सदर निवेदनातील अनेक मागण्यांपैकी एक मागणी देवस्थान इनाम वर्ग-३ च्या जमीनी कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावावर करण्याबाबत होती. राज्यातील देवस्थान इनाम जमिनींबाबत समस्यांचा अभ्यास करुन शिफारशी करण्याकरीता तत्कालिन राज्यमंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल शासनाच्या स्विकृतीकरीता शासनस्तरावर विचाराधीन आहे.

पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबत

(३०) २९७८४ (२३-१२-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पशुसंवर्धन विभागाच्या दिरंगाई कारभाराचा फटका राज्यातील ३०० पशुधन विकास अधिकाऱ्यांना बसला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत फेब्रुवारी, २०१४ मध्ये ३७२ पशुधन विकास अधिकारी गट अ या पदाकरीता जाहिरात देण्यात आली तद्नंतर एप्रिलमध्ये लेखा परिक्षा व सप्टेंबर, २०१४ मध्ये मुलाखाती घेण्यात आल्या त्यानंतर तब्बल ६ महिन्यानंतर एमपीएससीमार्फत मार्च, २०१५ मध्ये ३०० पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची राज्य शासनाला शिफारस करण्यात आली असून त्याची उद्यापर्यंत नियुक्ती करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नियुक्ती करण्यास विलंब लावणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२०-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) दि.१२.०३.२०१५ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने एकूण ३०० उमेदवारांची पशुधन विकास अधिकारी, गट-अ पदाकरीता शासनाकडे शिफारस केली आहे. शिफारस पात्र उमेदवारांपैकीज्यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र व पोलीस तपासणी अहवाल प्राप्त झाले अशा २७८ उमेदवारांना डिसेंबर, २०१५ अखेर रिक्त पदावर शासनाने पदस्थापना दिली आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

धामनगांव, बेलगाव, तहीळे, गंभीरवाडी या गावातील २२९ हेक्टर बागायती जमीन देवळाली कॅम्प येथील अर्टीलरी सेंटरसाठी युध्दाचा सराव करण्यासाठी संपादीत करण्याचा प्रस्ताव

(३१) २९८८५ (२३-१२-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इगतपुरी तालुक्यातील जि.नाशिक येथील धामनगांव, बेलगाव, तहीळे, गंभीरवाडी या गावातील २२९ हेक्टर बागायती जमीन देवळाली कॅम्प येथील अर्टीलरी सेंटरसाठी युध्दाचा सराव करण्यासाठी संपादीत करण्याचा प्रस्ताव लष्करी अधिका-यांनी नाशिकच्या जिल्हाधिकारी कार्यालयात सादर केला आहे. लष्कराच्या या प्रस्तावित भुसंपादनामुळे शेकडो शेतकरी भूमीहीन होणार असल्याने येथील शेतक-यानी या भूसंपदानाला तीव्र विरोध केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामस्थांच्या विरोधामुळे लष्करासाठीची भुसंपदान प्रक्रिया रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२३-०२-२०१६) :(१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर गावे आदिवासी भागातील असून या गावांच्या ग्रामसभेने ठरावान्वये भूसंपादनास नकार दिला असल्याने भूमिसंपादन, पूनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम ४१ प्रमाणे भूसंपादनाची प्रक्रिया करता येत नाही.

मुंबईतील वरळी येथील आरे दूध डेअरीत एनर्जीच्या सहा हाजार बाटल्या पडून असल्याबाबत

(३२) २९९९४ (२३-१२-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण) : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वरळी येथील आरे दूध डेअरीत एनर्जीच्या सहा हाजार बाटल्या पडून असून या बाटल्यांच्या बुचांना गंज आल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे असतांनाही दुग्धविकास सचिवानी एनर्जी उत्पादन करुन विक्रीचे कंत्राट पुण्याच्या शीतल आर्च कंपनीला पुन्हा मुदतवाढीने दिले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच दूध डेअरी व्यवस्थापनाने लस्सी आणि मसाला दुध यांचे उत्पादन मुद्दाम पूर्ण बंद केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास पुण्याच्या शीतल आर्च कंपनीच्या एनर्जीची विक्री जोरात सुरु असून वरळी डेअरीत एनर्जीचे उत्पादनही बंद केले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार संबंधित दोषी असणाऱ्या दुग्धविकास सचिवांनवर तसेच डेअरी व्यवस्थापनांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात यते आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२३-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

शितल आर्च कंपनीला ठेक्याची मुदत दि.२९.१.२०१५ पर्यंत देण्यात आली होती.

(३) व (४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

धनेगाव (ता.देवणी, जि.लातूर) येथील शासनाने मावेजा व पुनर्वसनाचा प्रश्न निकाली काडण्याबाबत

(३३) ३००३१ (१८-०१-२०१६). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धनेगाव (ता.देवणी, जि.लातूर) येथील गेल्या ८ वर्षापासून भूसंपादन व शेतक-यांचे आंदोलन या वादात बॅरेजेसचा प्रश्न प्रलंबित राहिला असल्याचे माहे ऑक्टोबर,२०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुष्काळी परिस्थितीमुळे पाण्याचा मोठा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असताना पाणी प्रकल्पात न थांबता शेजारच्या कर्नाटक राज्यात वाहून जात असल्याने शासनाने मावेजा व पुनर्वसनाचा प्रश्न निकाली काढण्याबाबत काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२४-०२-२०१६) :(१) होय. खरे आहे.
(२) हो अंशत: खरे आहे. धनेगाव उच्च पातळी बंधाऱ्यासाठीच्या बाधित शेतकऱ्यांनी भूसंपादा कार्यावाहीस विरोध केल्याने प्रकल्पातील पाणी वाया जाऊ नये म्हणून सद्यस्थितीत या प्रकल्पात मांजरा नदीच्या नैसर्गीक पात्राच्या हद्दीपर्यंत अंदाजे ३ मीटर पाण्याचा साठा करण्यात येत असून, शेतकऱ्यांच्या मागणीनुसार भुसंपादन मोबदल्याची पुर्ण रक्कम वाटप झाल्यानंतर प्रकल्पाच्या पूर्ण क्षमतेचा पाणीसाठा करणे प्रस्तावीत आहे. त्यासाठी नवीन भूसंपादन अधिनियम The right to fair compensation and transparency in land acquisition, rehabilitation and resettlement Act २०१३ नुसार भुसंदपान निवाडे अंतिम करुन शेतकऱ्यांना तातडीने मोबदल्याचे वाटप करण्यात येत आहे. सदर बंधाऱ्यासाठी भूसंपादपनाची एकूण सात प्रकरणे भूसंपादन कार्यावाहीत असून त्यापैकी एका प्रकरणाचा निवाडा दि.११.०१.२०१६ रोजी जाहीर करण्यात आला आहे. उर्वरित सहा प्रकरणे निवाडा स्तरावर असून या सर्वप्ररणातील भूसंपादन निवाडे तातडीने तयार करुन मोबदल्याचे वाटप करण्यात येत आहे.
(३) प्रकरणात धनेंगाव उच्चपातळी बंधाऱ्यासाठी भुसंपादन अधिनियम १८९४ मधील तरतूदीनुसार भुसंपादनाची कार्यवाही चालु असताना शेतकऱ्यांनी वेळोवेळी केलेल्या आंदोलनामुळे व दिनांक १.१.२०१४ नवीन भूसंपादन कायदा The right to fair compensation and transparency in land acquisition, rehabilitation and resettlement Act २०१३ अस्तीत्वात आल्यामुळे भूसंपदान कार्यावाहीस विलंब झालेला आहे.

राज्यातील खोल समुद्रात मासेमारीसाठी मच्छिमारी सोसायट्यांना परवाने मिळण्यास विलंब होत असल्याबाबत

(३४) ३०३३० (२३-१२-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खोल समुद्रात मासेमारीसाठी मच्छिमारी सोसायट्यांना परवाने मिळण्यास विलंब होत असल्याने त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याने हे परवाने विनाविलंब द्यावेत अशी मागणी नॅशनल असोसिएशन ऑफ फिशरमॅन या संघटनेने माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मच्छिमारांना मच्छिमारीसाठी विनाविलंब परवाने देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२३-०२-२०१६) :(१) हे खरे नाही. खोल समुद्रात मासेमारी करण्यासाठी केंद्र शासनाची (L.O.P.) letter permission आवश्यक आहे. तथापि अशा प्रकारचे अर्ज प्राप्त झालेले नाहीत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यात जनावरांच्या डॉक्टरांची पदे तातडीने भरणेबाबत

(३५) ३०४३२ (२३-१२-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात ८ लाख ५० हजार जनावरे असतांना जनावरांच्या उपचारासाठी १७२ दवाखाने असून जनावरांच्या उपचारांसाठी केवळ ५९ डॉक्टर सद्य स्थितीत कार्यरत असल्याने जनावरांना योग्य वेळेत औषधोपचार मिळत नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार जनावरांना वेळेत व पुरेश्या प्रमाणात उपचार मिळावेत म्हणून जनावरांच्या डॉक्टरांची पदे तातडीने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२०-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये सद्य:स्थितीत ६७ पशुधन विकास अधिकारी कार्यरत असून ५१ पदे रिक्त आहेत. रिक्त असलेल्या पदाचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुधन विकास अधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आला असून पशुपालकांना नियमितपणे पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मंगळवेढा (ता.जि.सोलापूर) येथील भूमी अभिलेख कार्यालयातील
२१ पैकी १० पदे रिक्त असल्याबाबत

(३६) ३०९६४ (०८-०१-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (ता.जि.सोलापूर) येथील भूमी अभिलेख कार्यालयातील २१ पैकी १० पदे रिक्त असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील आठ महिन्यापासून प्रभारी उपअधिक्षक ही सर्व कामे करीत असल्याने त्यांच्यावर कामाचा अतिरिक्त भार पडत असल्याने या परिसरातील नागरिकांना आवश्यक

असणाऱ्या विविध दाखल्यांसाठी व शेतीविषय कामांसाठी गैरसोय होत असल्याचे लक्षात घेता भूमी अभिलेख कार्यालयातील रिक्त असलेली पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२३-०२-२०१६) :(१), (२) व (३) उप अधिक्षक भूमि अभिलेख मंगळवेढा या कार्यालयात वर्ग-२ चे १ पद, वर्ग ३ ची ३ पदे, वर्ग-४ ची २ पदे अशी एकूण ६ पदे रिक्त आहेत.

उप अधिक्षक भूमि अभिलेख, मंगळवेढा हे पद सेवानिवृतीमुळे रिक्त आहे. सदरचा पदभार उप अधिक्षक भूमि अभिलेख, सांगोला यांचेकडे प्रशासकीय कारणास्तव सोपविण्यात आलेला आहे.

उप अधिक्षक भूमि अभिलेख मंगळवेढा हे पद नियतकालीक बदलीच्यावेळी भरणेस प्राधान्याने विचार करणेत येईल. सरळसेवा भरती अंतर्गत भरतीप्रक्रिया सुरु असून नजीकच्या काळात उप अधिक्षक भूमि अभिलेख, मंगळवेढा कार्यलयातील वर्ग-३ व वर्ग-४ संवर्गातील रिक्त पदे भरणेची तजबीज ठेवली आहे.

वाशिम जिल्ह्यातील चिंचाबापेन येथील पशूवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ दुरवस्थेत असल्याबाबत

(३७) ३११३९ (११-०१-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील चिंचाबापेन येथील पशूवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ यांची दुरवस्था झाली असून या दवाखाण्यात सोयी सुविधा उपलब्ध नसून या दवाखान्याच्या इमारतींना तडे गेल्याने ही इमारत कधीही पडून मोठया प्रमाणात जीवीत हाणी होण्याचा धोका निर्माण झाला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर दवाखान्याची दुरुस्त करुन सोयीसुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२०-०२-२०१६) :(१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) इमारतींच्या भिंतीना तडे गेल्यामुळे निर्माण झालेल्या फटी बुजविण्यात आल्या आहेत. तसेच अन्य सोयी व दुरुस्तीची कामे पूर्ण करण्याबाबत कार्यकारी अभियंता, (बांधकाम) जिल्हा परिषद, वाशिम यांना सूचना दिलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महानिर्मितीच्या परळी वीज केंद्रातील वीज निर्मिती पाण्याअभावी पूर्णपणे ठप्प झाली असल्याबाबत

(३८) ३१२८२ (०८-०१-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानिर्मितीच्या परळी वीज केंद्रातील वीज निर्मिती पाण्याअभावी पूर्णपणे ठप्प झाली असून, ११.३० मेगावॅट वीज निर्मिती क्षमता असतानाही येथून सध्या एक युनीटही वीजनिर्मिती होत नसल्यामुळे या प्रकल्पाच्या कर्जावरील व्याज, कर्मचाऱ्यांचे पगार आणि प्रशासकीय खर्चाचा महिन्याला ६३.२५ कोटी रूपयांचा भुर्दड वीज ग्राहकांना सहन करावा लागणार असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेरिट डिस्पॅच ऑर्डरमध्ये मंजूर केलेल्या दरापेक्षा परळीचा दर जास्त असल्याचे कारणे देत महावितरणने परळीचा फिक्स चार्ज नाकारून वीज ग्राहकांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०२-२०१६) :(१) परळी वीज केंद्रातील वीज निर्मिती पाण्याअभावी पूर्णपणे बंद आहे, हे खरे आहे. तथापि, सदरहू प्रकल्पांसाठी सद्दस्थितीत फक्त अत्यावश्यक कर्मचारी नियुक्त केले असून इतर प्रशासकीय खर्चही कमीतकमी केला जात आहे. तसेच कोणताही अतिरिक्त खर्च केला जात नसून प्रकल्पाच्या स्थिर आकाराचा कमीतकमी आर्थिक भार ग्राहकांवर यावा याबाबत महानिर्मिती कंपनीचे प्रयत्न आहेत.

(२) महानिर्मिती कंपनीकडून आकारला जाणारा स्थिर आकार हा राज्य वीज नियामक आयोगाच्या वीजदर विनियम, २०११ प्रमाणे आकारण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

उदगीर (जि.लातूर) येथील देश पातळीवरील दुध भुकटी प्रकल्प सुरु करणेबाबत

(३९) ३१५१६ (०८०१-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) येथील दुध भुकटी प्रकल्पाचे तीन वेळा पुर्नजिवीत होवूनही सुरु न झाल्यामुळे यासंदर्भात लोकप्रतिनिधीनी वारंवार शासनस्तरावर, पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दुध भुकटी प्रकल्प पुर्नजीवीत करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२३-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) दुध भुकटी प्रकल्प पी.पी.पी. अंतर्गत पुर्नजिवीत करावयाचे विचाराधीन आहे.
(४) लागू होत नाही.

राज्यातील विकास प्रकल्पासाठी लागणारी खाजगी जमीन थेट खरेदी करण्याचा अधिकार शासनाने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या समितीला दिल्याबाबत

(४०) ३१५५४ (०८-०१-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विकास प्रकल्पासाठी लागणारी खाजगी जमीन थेट खरेदी करण्याचा अधिकार शासनाने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या समितीला दिला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या जमिनी सिंचन प्रकल्पाच्या नांवावर बळकावण्याचा शासनाचा हेतू असल्याचा शेतकरी आरोप करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग(१) मध्ये शेतकऱ्यांनी केलेल्या आरोपाची शहानिशा करुन सदर जिल्हाधिकारी या समितीला कोणत्या निकषाद्वारे खाजगी जमिनी खरेदी करण्याचे अधिकार दिले आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०३-०३-२०१६) :(१) होय, हे अंशत: खरे आहे.
खाजगी क्षेत्रातील जमीन सिंचन व इतर प्रकल्पांसाठी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने घेण्याबाबतचा शासन निर्णय दि.१२.५.२०१५ रोजी व दिनांक ३०.९.२०१५ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे व सदर शासन निर्णयानुसार थेट खरेदी करावयाच्या जमिनीच्या मोबदल्याचा दर ठरविण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याबाबतची तरतूद करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीला खाजगी जमीन खरेदी करण्याचे अधिकार दिलेले नसून जमिनीच्या मोबदल्याचे दर ठरविण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

डोणगांव (जि.बुलढाणा) येथील पशुवैद्यकिय दवाखान्यात गेल्या आठ महिन्यापासून पशुवैद्यकिय अधिकारी नसल्याबाबत

(४१) ३२००५ (०८-०१-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोणगांव (जि.बुलढाणा) येथील पशुवैद्यकिय दवाखान्यात गेल्या आठ महिन्यापासून पशुवैद्यकिय अधिकारी नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे गरीब पशुपालकांना खाजगी डॉक्टरांकडे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दवाखान्यात पशुवैद्यकीय अधिकारी नसल्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच सदर पद तातडीने भरण्यासदंर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. एकनाथराव खडसे (२०-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.

पशुवैद्यकिय दवाखाना श्रेणी-१ डोणगांव हे पद रिक्त असल्याने सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार पशुधन विकास अधिकारी, पशुवैद्यकीय दवाखाना, श्रेणी-१ जानेफळ यांचेकडे सोपवून त्यांचे मार्फत पशुपालकांना वैद्यकीय सेवा पुरविण्यात येत होत्या. आता सदर रिक्त पदावर दिनांक १६.१.२०१५ पासून नियमित पशुधन विकास अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचे मार्फत नियमितपणे वेद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मेहकर (जि.बुलढाणा) येथील तालुका पशुवैद्यकिय दवाखान्यांच्या परिसरातील झाडांची तोड केल्याबाबत

(४२) ३२००६ (०८-०१-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) येथील तालुका पशुवैद्यकिय दवाखान्यांच्या परिसरातील झाडांची चिकित्सालयातील सहायक आयुक्तानेच विना परवानगी तोड करुन विक्री केल्याचे दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारस निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने दोषी असणाऱ्या सहाय्यक आयुक्तांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१६-०२-२०१६) :(१) हे अंशत: खरे आहे.

(२) सदर प्रकरणी केलेल्या चौकशीमध्ये सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, मेहकर जि.बुलढाणा यांनी त्यांचे कार्यालयातील २ कडुनिबांच्या व १

गुलमोहराच्या झाडांच्या फांद्याचा स्पर्श जवळच्या विद्युत तारांना होत असल्याने त्या फांद्यांची छटाई केली. तथापि, सदर छटाईसाठी त्यांनी परवानगी घेतली नसल्याने चौकशीत आढळून आले.

(३) प्रस्तुत प्रकरणी मुख्याधिकारी, नगर परिषद, मेहकर यांनी सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, मेहकर जि.बुलढाणा यांच्या कृतीबद्दल त्यांना रु.१०,०००/- इतका दंड ठोठाविला आहे. तसेच यापुढे संबंधीत विभागाची परवानगी घेऊनच कार्यवाही करण्याबाबत ताकीद दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

हिंगोली जिल्ह्यातील स्थलांतरीत पशुवैकीय दवाखाने श्रेणी-१ यांचे स्थलांतरणाचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत

(४३) ३२६८४ (२३-१०-२०१५). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील स्थलांतरीत पशुवैकीय दवाखाने श्रेणी -१ यांचे स्थलांतरणाचे प्रस्ताव शासनाकडे मंजूर करीता प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास सत्वर मंजूरी मिळण्याकरिता मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री पशुसवंर्धन यांना दिनांक २५ जानेवारी, २०१५ रोजी लेखी निवेदन दिले होते हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास मंजूरी मिळण्याण्याबाबत निवेदनावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४)नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२०-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय स्थापनेमुळे स्थलांतरित करावयाच्या दवाखान्याच्या ठिकाणी नवीन पदनिर्मिती आवश्यक असल्याने व राज्याची महसुली तूट, राज्याच्या तिजोरीवरील ताण, तसेच आस्थापना खर्च मर्यादित करण्याची निकड लक्षात घेता सद्यस्थितीत विभागाचा प्रस्ताव मान्य करणे शक्य नाही. किंबहुना आर्थिक भाराच्या वाढीचे प्रस्ताव वित्त विभागास सादर करु नयेत, असे अभिप्राय देऊन विभागाचा प्रस्ताव नाकारल्यामुळे आवश्यक नवीन पदनिर्मिती झालेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड येथील कृष्णूर एमआयडीसीतील अखंडीत विजपुरवठा करण्याबाबत

(४४) ३३९७८ (२३-११-२०१५). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील कृष्णूर एमआयडीसीमध्ये अखंडीत विजपुरवठा होण्यासाठी येथील उद्योजकांकडून मागणी असूनही येथे विद्यूत उपकेंद्र उभारण्यात महापारेषणाकडून दिरंगाई होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील उद्योजकांना अखंडीत वीजपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) २२० के.व्ही. कृष्णरु उपकेंद्र व संलग्न वाहिनी उभारण्याचे काम मे. इसीआय-शांघाय या कंपनीस देण्यात आले होते. तथापि, उपकेंद्र व वाहिनीच्या कामाची गती अपेक्षेनुसार नसल्याने महापारेषण कंपनीतर्फे उपकेंद्र व वाहिनीचे कंत्राट रद्द करण्यात आले. त्यानंतर जुलै-२०१३, फेब्रुवारी २०१४ व डिसेंबर २०१४ मध्ये उपकेंद्र व वाहिनीच्या उर्वरित कामांसाठी सांधिक कार्यालय स्तरावर निविदा प्रसिध्द करण्यात आल्या होत्या तथापि, समाधानकारक प्रतिसाद मिळाला नाही. सद्यस्थितीत दोन्ही कामांसाठी नविन कंत्राट देण्यासंबंधीची कार्यवाही महापारेषण कंपनीमार्फत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मच्छिमारांना गेल्या अनेक वर्षापासून डिझेल परताव्याच्या रकमेचे वाटप करण्यात आले नसल्याबाबत

(४५) ३४६०६ (०८-०१-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मच्छिमारांना गेल्या अनेक वर्षापासून डिझेल परताव्याच्या रकमेचे वाटप करण्यात आले नसल्याचे नुकतेच माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,उर्वरित डिझेल परताव्यापोटी शासनाने अर्थसंकल्पात तरतुद केली आहे काय, असल्यास किती,
(३) असल्यास, सदर डिझेल परताव्यापोटी थकित रक्कम मच्छिमारांना तात्काळ देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०३-०३-२०१६) :(१) होय, अंशत: खरे आहे.
(२) सन २०१५-१६ या वर्षाकरीता रु. ६०.०० कोटीची तरतूद करण्यात आली असून जुलै, २०१५ च्या अधिवेशनात रु. ६८.९० कोटीची पुरक मागणीद्वारे अधिकची तरतूद करण्यात आली आहे.
(३) सन २०१५-१६ यावर्षात आतापर्यंत रु. ११६.०४ कोटी इतकी तरतूद वितरीत करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

वरळी मुंबई येथील दुग्धशाळा वसाहतींचा पुनर्विकास करण्यात येऊन दुग्धशाळेतील कर्मचाऱ्यांना तातडीने निवासस्थाने उपलब्ध करुन देण्याबाबत

(४६) ३६२२१ (२३-१२-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी मुंबई येथील दुग्धशाळा वसाहतींचा पुनर्विकास करण्यात येऊन तेथील सुमारे ५० वर्षे शासन सेवेत कार्यरत असणाऱ्या आणि सद्य:स्थितीत दुग्धशाळा वसाहतीत राहत असलेल्या कर्मचाऱ्यांना तातडीने कायमस्वरुपी निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यात यावी, अशी मागणी दुग्धशाळा कर्मचारी व मा.लोकप्रतिनिधी यांनी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने सदर वसाहतींचा पुनर्विकास व तेथील कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी निवासस्थाने उपलब्ध करून देण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२३-०२-२०१६) :(१) व (२) दुग्धव्यवसाय विकास विभागातील शासकीय वसाहतींना पुनर्विकास करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही. त्यामुळे वसाहतीत राहात असलेल्या कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी निवासस्थाने उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला जिल्ह्यात विविध शासकीय कार्यालय आणि न्यायालयामध्ये रेव्हीन्यूव स्टॅम्पचा हिशोब नसल्याबाबत

(४७) ३६४४७ (०८-०१-२०१६). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात विविध शासकीय कार्यालय व न्यायालयामध्ये वेगवेगळ्या कामासाठी सादर केलेल्या कागदपत्रांना ५ ते १०० रुपयांपर्यंतचे स्टॅम्प लावण्याचा कायदा असून कोणत्या विभागामध्ये दर महिन्याला किती रेव्हीन्यूव स्टॅम्प गोळा झाले याचा हिशोब ठेवणे कायद्याने बंधनकारक असताना बहुतांश विभागांमध्ये रेव्हीन्यूव स्टॅम्पचा हिशोब ठेवला नसल्याची गंभीर बाब ऑगस्ट, २०१५ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भविष्यात अशा नोंद नसल्याने रेव्हीन्यूव स्टॅम्पचा घोटाळा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हाधिकाऱ्यांनी कायद्याप्रमाणे जिल्ह्यातील प्रत्येक विभागाकडून दर महिन्याला आलेल्या रेव्हीन्यूव स्टॅम्पचा हिशोबाचा अहवाल मागवून त्या अहवालानुसार कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२६-०२-२०१६) :(१) व (२) हे खरे नाही.

(३) सह जिल्हा निबंधक, वर्ग-१ अकोला यांचेकडून अकोला जिल्ह्यातील जिल्हा कोषागार कार्यालयांकडून रेव्हेन्यु, स्टॅम्प, कोर्ट फी, जनरल मुद्रांक, ऑडेसिव्ह स्टॅम्प याबाबतची मुद्रांक निहाय विक्री व पुरवठा बाबतची माहिती दरमहा संकलित करण्यात येते. या प्रकरातील मुद्रांकाची विक्रीयाबाबतची संकलित माहिती सह जिल्हा निंबधक, वर्ग-१ अकोला यांचेकडून वरिष्ठ कार्यालयास दरमहा सादर करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यामध्ये दुग्धउत्पादनास चालना देण्यासाठी संकरित गाई, म्हशींचा अनुदानित गट वाटप करण्याची नाविन्यपूर्ण राज्यस्तरीय योजना राबविण्याबाबत

(४८) ३६६०९ (०८-०१-२०१६). श्री.बबनराव शिंदे (माढा) : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये दुग्धउत्पादनास चालना देण्यासाठी संकरित गाई, म्हशींचा अनुदानित गट वाटप करण्याची नाविन्यपूर्ण राज्यस्तरीय योजना सर्वसाधारण, अनुसुचित जाती, जमाती यांच्यासाठी राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनुदानित नाविन्यपूर्ण योजनेतून सोलापूर जिल्ह्यासह पश्चिम महाराष्ट्रातील जिल्हे वगळण्यात आलेले आहेत हे दिनांक.०३ नोव्हेंबर,२०१५ वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व तद्नुसार सदर योजनेमधून वगळण्यात आलेल्या जिल्ह्यांचा समावेश करण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केलेली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२३-०२-२०१६) :(१) होय.

(२) हे खरे आहे.

(३) दि. ३० ऑक्टोबर, २०१५ च्या शासन निर्णयानुसार दुग्धाउत्पादनामध्ये स्वयंपुर्ण असलेले पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर व अहमदनगर हे सहा जिल्हे वगळून उर्वरीत जिल्ह्यांमध्ये सदरची योजना राबविण्यात यावी, असा निर्णय झालेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

दुसऱ्या कोळीवाडयातील रहिवाशी इतरत्र निघुन गेल्याने काहींना चौपाटीच्या कोपऱ्यात मफतलाल जलतरण तलावाच्या बाजूला दिलेल्या जागेत सहा झोपडयात राहून मासेमारीचा व्यवसाय करीत असल्याबाबत

(४९) ३८२२४ (११-०१-२०१६). ॲड.वारीस पठाण (भायखळा) : सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागरी सुविधांचा अभाव असल्यामुळे दुसऱ्या कोळीवाडयातील रहिवाशी इतरत्र निघुन गेल्याने काहींना चौपाटीच्या कोपऱ्यात मफतलाल जलतरण तलावाच्या बाजूला दिलेल्या जागेत सहा झोपडया बांधून ते राहत असून मासेमारी करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असून ससून डॉककडून गिरगाव चौपाटी बंदरात मासेमारी करण्याचा अनेक वर्षे परवाना दिला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने महाराष्ट्राच्या सागरी किनाऱ्यावरील मासेमारीसाठी बंदराची अधिसूचना काडली असून त्या अधिसूचनेत गिरगांव चौपाटीचा समावेश नसल्याने मासेमारी करता येणार नसल्याचे नोटीसीत नमूद केले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास प्रश्नोक्त भाग १, २ व ३ या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने कोळीबांधवाना न्याय देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२०-०२-२०१६) :(१) होय.

(२) होय. अधिसुचनेनुसार गिरगांव चौपाटी येथे नौका वापरण्यास राज्यात मज्जाव करण्यात आला आहे.

(३) व (४) मस्छिमारांना नजीकच्या बंदरातून नौका वापर करुन मासेमारी करता येणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

नाशिक औष्णिक विद्युत प्रकल्प एकलहरे (ता.जि.नाशिक) येथे मंजूर असलेला ६६० मेगावॅट क्षमतेचा विद्युत प्रकल्प अद्‌याप सुरु झाला नसल्याबाबत

(५०) ३८६६२ (११-०१-२०१६). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक औष्णिक विद्‌यूत प्रकल्प एकलहरे (ता.जि.नाशिक) येथे सन २०१० साली मंजूर झालेला ६६० मेगावॅट क्षमतेचा विद्युत प्रकल्प अद्‌याप सुरु झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प प्रलंबित राहाण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकल्प सुरु करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०२-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.

(२) प्रस्तावित प्रकल्पास एअरपोर्ट ॲथोरिटीकडून आवश्यक उंचीच्या धुरांडे (Chimney) बांधकामास नाहरकत परवाना प्राप्त न झाल्यामुळे पर्यावरण ना-हरकत परवाना प्राप्त होण्यास अडचणी येत आहेत. तसेच कोळशाच्या उपलब्धतेबाबतची अनिश्चितता व इतर वाणिज्यिक व तांत्रिक बाबीची पूर्तता न झाल्याने प्रकल्पाची उभारणी सुरु करण्यास विलंब होत आहे.

(३) प्रस्तावित प्रकल्पासाठी चिमणीच्या आवश्यक २८० मी.उंचीला परवानगी देण्याबाबत महानिर्मिती कंपनीकडून एअरपोर्ट ॲथोरिटी ऑफ इंडिया, नाशिक रोड व स्टेशन कमाडन्ट, देवळाली यांचेकडे सतत पाठपुरावा करण्यात आला आहे. तथापि, सदर विनंती अमान्य झाली असल्याने प्रस्तुत प्रकरणी पुनर्विलोकन करुन ना हरकत परवाना देण्याबाबत विभाग स्तरावरुन रक्षा प्राधिकारी, मुख्य कार्यालय, कुलाबा, मुंबई तसेच मा.मुख्यमंत्री यांचे स्तरावर मा.केंद्रीय संरक्षण मंत्री यांना विनंती करण्यात आली आहे.

सदर प्रकल्पासाठी कोळसा मंत्रालयाने नागपूर येथील महाजनवाडी कोळसा खाण आवंटित केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.